15-03-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/14/2025 10:01 PM Page 1



निवडक



साखळी : रंगांची उधळण करीत विद्यार्थ्यांनी साजरी केली रंगपंचमी.

## हेडगेवार प्राथमिक विद्यालय साखळी येथे होळी साजरी

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १४ :** होळी हा सण रंगाचा, वाईट वृत्तींवर चांगल्या वृत्तींच्या विजयाचा असा होळीचा सण, डॉ. के. ब. हेडगेवार प्राथमिक विद्यालय साखळी येथे साजरा केला गेला. सकाळी प्रार्थना सभेत विद्यार्थ्यांना शिक्षिका दिशा वाळवे यांनी होळी का आणि कशी साजरी करावी त्याबद्दल माहिती सांगितली. मुख्य म्हणजे ही होळी कृत्रिम रंगाचा वापर न करता, भुईपाल गावचे रहिवासी सुर्यकांत गावकर यांनी स्वतः तयार केलेले नैसर्गिक रंग वापरून होळीचे रंग उधळून खेळण्यात आली. या नैसर्गिक रंगांमध्ये सर्व विद्यार्थ्यांनी होळी सणाचा मनमुराद आनंद लुटला.

---

## मडगावात आज अशोक बोरकर काव्यमैफल

■ टीम दैनिक हेराल्ड

**नावेली, दि. १४ :** अशोक बोरकर काव्य मैफल या बहुभाषिक काव्य मैफलचा २३७ वा भाग शनिवार दि. १५ रोजी मडगाव येथील वातानुकूलीन मंथन सभागृहात संध्याकाळी ४.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. साहित्यिक चित्रा क्षीरसागर या नारीशक्ती या विषयावर आपले विचार व्यक्त करतील. या कार्यक्रमा अंतर्गत शोभा धामस्कर (साहित्यिक) आणि गायत्री हळबे (उद्योजिका ) यांचा सन्मान ज्येष्ठ साहित्यिका मेघना कुरुंदवाडकर यांच्या हस्ते करण्यात येईल. ही काव्य मैफल सर्वांसाठी खुली असून आपली स्वरचित किंवा आपल्याला आवडलेली कोणतीही स्वरचित, आवडलेली, कोणत्याही भाषेतील कविता सादर करण्याची मुभा आहे. होळीनिमित्त खेळ व इतर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमसर्वांसाठी मोफत असून या काव्य मैफल मध्ये सर्व रसिकांनी उपस्थित राहून काव्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन काव्य मैफल च्या संस्थापिका कविता बोरकर यांनी कळविले आहे.

---

## अपूर्व प्रकाशन मंगेशीतर्फे पणजीत उद्या ‘फाटल्यान वळून पळयतना...’

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे दि. १४ :** अपूर्व प्रकाशन मंगेशीतर्फे रविवारी दि. १६ रोजी संध्याकाळी ४.३० वाजचा कला आणि संस्कृती भवन, पाटो – पणजी येथे केंद्रीय साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कवी आणि लेखक स्व. संजीव वेरेकर यांच्या दुसऱ्या पुण्यतिथी निमित्त 'फाटल्यान वळून पळयतना....' या त्यांच्या आत्मकथेच्या पुस्तकाचा विमोचन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास प्रमुख पाहुण्या म्हणून माजी वीजमंत्री निर्मला सावंत उपस्थित राहणार असून अध्यक्षस्थानी नामवंत साहित्यीक व साहित्य अकादमी पुरस्कार विजेते लेखक मुकेश थळी उपस्थित राहणार आहेत. यानिमित्त स्व .संजीव वेरेकर यांच्या स्मरणार्थ दुसरे अखिल भारतीय कोंकणी कविता लेखन स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देण्यात येणार आहेत. या सोहळ्यास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अपूर्व प्रकाशनाच्या प्रमुख स्नेहा वेरेकर व समिधा वेरेकर यांनी केले आहे.

---

## पणजी शिमगोत्सव समितीतर्फे गुलालोत्सव उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १४ :** शुक्रवारी रंगपंचमी दिवशी पणजी शिमगोत्सव समितीतर्फे पणजीच्या आझाद मैदानावर आयोजित केलेला गुलालोत्सवात आबाल, वृद्ध, महिला, तरूण वर्ग,पर्यटक यांनी मोठ्या उत्साहाने भाग घेऊन आनंद लुटला. हजोरच्या संख्येने लोकानी हजेरी लावली होती. ओम बिट्स वाद्यवृंदाच्या तालावर बेधुंद होऊन लोकं तीन तास नाचत होती. फर्मास निवेदन आणि औचित्यपूर्ण गीते सादर करून सिमी फोंडेकर यांनी विशेष बहार आणली. श्री. महालक्ष्मीला नमन करून वाजत गाजत आझाद मैदानावर शोभायात्रा पोचताच गुलालोत्सवालाप्रारंभ झाला व त्यात जात, धर्म, पंथ बाजूला ठेवून सगळ्यांनी उस्फूर्त सहभाग दिला होता. भाजपा प्रदेशाध्यक्ष दामू नाईक,पणजी शिगमोत्सव समितीचे मानद अध्यक्ष श्रीनिवास धेंपे, कार्यकारी अध्यक्ष मंगलदास नाईक, सचिव शांताराम नाईक, माजी जिल्हा पंचायत उपाध्यक्ष किशोर नार्वेकर आदींनी महालक्ष्मी चरणी नमन करून शोभायात्रेत सहभाग घेतला. आझाद मैदानावर गुलालोत्सवात , राज्य सभा सदस्य सदानंद तानावडे, पणजीचे महापौर रोहित मोन्सेरात, उपमहापौर संजीव नाईक, माजी आमदार सिद्धार्थ कुंकळकर यांनी हजेरी लावली. तानावडे व दामू नाईक यांनी उपस्थित सर्वांना रंगपंचमीनिमित्ताने शुभेच्छा दिल्या. संध्याकाळी आझाद मैदानावर सांज मेलोडिज ऑर्केस्ट्रा सादर झाला.

# नौदलाच्या एनओसीशिवाय उड्डाणपुलाचे काम थांबवण्याचे निर्देश

### आयसीएओच्या मापदंडांच्या विरोधात असल्याने एनएचएआयला प्रकल्प पुढे नेण्यास मनाई

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १४ :** दक्षिण गोव्यातील उड्डाणपूल प्रकल्पासंदर्भात भारतीय नौदलाने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला (एनएचएआय) स्पष्ट सूचना दिल्या आहेत. सध्याची उंची आयसीएओच्या (आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक संघटना) मापदंडांच्या विरोधात असल्याने एनएचएआयला प्रकल्प पुढे नेण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यांना आवश्यक बदलांसह पुन्हा अर्ज करण्यास सांगण्यात आले आहे, अशी माहिती एका वरिष्ठ नौदल अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर दिली.

या प्रकरणाशी संबंधित असलेल्या याचिकाकर्ता अतुल पंत यांना एनएचएआयच्या प्रकल्पाविषयी नौदलाने पाठवलेल्या पत्राची माहिती मिळाल्यानंतर त्यांच्यावर कडक नजर ठेवण्यात आली आहे. नौदलाकडून संपर्क साधण्याची सूचना दिल्यानंतरही एनएचएआयने एनओसीशिवाय (अनापत्ती प्रमाणपत्र) काम सुरू ठेवले आहे. आता त्यांना पत्र पाठवले गेले आहे, त्यामुळे ते एनओसीशिवाय काम सुरू ठेवतात की नाही हे पाहणे महत्त्वाचे ठरेल, असे पंत यांनी सांगितले.

नौदलाने एनएचएआयला पाठवलेल्या पत्रावरून हे स्पष्ट होते की, एनओसीचा अर्जच करण्यात आला नव्हता. यामुळे १ ऑगस्ट २०२४ रोजी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी संसदेत दिलेल्या चुकीच्या माहितीकडे लक्ष वेधले गेले आहे. गडकरी यांना विचारण्यात आले होते की, दाबोळी विमानतळाच्या नियोजनासाठी उंची मर्यादांचा विचार करण्यात आला होता का? यावर त्यांनी होय, उंचीच्या मर्यादांसह प्रस्ताव तयार करण्यात आला आहे, असे उत्तर दिले होते.

खोटी माहिती देण्यामागे रिअल इस्टेट लॉबीचा दबाव असू शकतो. विमानतळ बंद केल्यानंतर उड्डाणपूलासाठी नौदलाची परवानगी आवश्यक राहणार नाही, असा आरोप दक्षिण गोव्याचे खासदार विरियेतो फर्नांडिस यांनी केला. विमानतळ सुरू राहील असे वारंवार आश्वासन देऊन लोकांची फसवणूक केली जात आहे. जर विमानतळ कायम सुरू राहणार असेल, तर नौदलाची परवानगी न घेता उड्डाणपूलाचे काम कसे सुरू झाले? असा सवाल फर्नांडिस यांनी केला.

एनएचएआयने संसदेत मंत्र्यांना चुकीची माहिती दिली आहे. त्यांना हे ठाऊक नसावे की मी त्यांच्या मंत्र्यांविरुद्ध चुकीची माहिती दिल्याबद्दल विशेषाधिकार प्रस्ताव मांडू शकतो, असा इशारा फर्नांडिस यांनी दिला. उच्च न्यायालयाने यापूर्वी अनेक वेळा आमच्या मदतीला धावून आले आहे. आता नौदल आमच्या बाजूने लढत आहे. केंद्र सरकारच्या अकार्यक्षमतेमुळे केंद्रीय एजन्सींना मदतीला यावे लागते, हे दुर्दैवी आहे, अशी प्रतिक्रिया ऑल गोवा टॅक्सी असोसिएशनचे अध्यक्ष चेतन कामत यांनी दिली. विमानतळावर अवलंबून असलेल्या स्थानिकांचा उपजीविकेचा प्रश्न आहे. विमानतळ बंद झाल्यास पर्यटनावर परिणाम होईल. विमानतळ बंद करून सरकार स्थानिकांचे जीवन उद्ध्वस्त करणार का? असा सवाल कामत यांनी केला.

एनएचएआयने भारतीय नौदलाकडून चार वेळा पाठवलेल्या पत्रांना उत्तर दिलेले नाही. यामुळे नौदलाचे निवृत्त कमांडर अतुल पंत यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठात धाव घेतली आहे. झुआरीनगर ते बोगमाळे या दरम्यान चार पदरी उड्डाणपूल उभारला जात असून, त्याचा सुमारे १.८ ते २.२ किमीचा भाग ऑब्स्टॅकल लिमिटेशन सरफेस (ओएलएस) अंतर्गत येतो. यामुळे दाबोळी विमानतळावरील व्यावसायिक उड्डाणांवर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



# उष्णतेच्या लाटेमुळे शहाळी विक्री वाढली

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १४ :** उष्णतेची लाट आणि वाढत्या तापमानामुळे सासष्टी तालुक्यातील नारळ विक्रेत्यांसाठी हा हंगाम वरदान ठरत आहे. स्थानिक नागरिक आणि पर्यटक उष्णतेपासून दिलासा मिळवण्यासाठी नारळाच्या पाण्याचा मोठ्या प्रमाणावर वापर करत असल्याने विक्रेत्यांच्या व्यवसायाला चालना मिळाली आहे.

सासष्टीमधील ५० हून अधिक गावांमध्ये सुमारे २०० पेक्षा अधिक नारळ विक्रेते काम करतात. विशेषतः किनारपट्टीच्या भागात त्यांचा व्यवसाय विस्तारत आहे. मागणीत झालेल्या वाढीमुळे ताज्या शहाळ्याच्या पाण्यासाठी मोठ्या संख्येने ग्राहक विक्रेत्यांकडे गर्दी करत आहेत.

गोगोळ सर्कलजवळील नारळ विक्रेता हसन अली यांनी सांगितले की, तीव्र उष्णतेमुळे त्यांच्या विक्रीत ल वाढ झाली आहे. मी अनेक वर्षांपासून नारळ विकतो आहे. उन्हाळ्यात मागणी नेहमीच वाढते, पण यंदा तीव्र उष्णतेमुळे ग्राहकांची संख्या आणखी वाढली आहे, असे अली म्हणाले. अली यांनी नमूद केले की, साधारणपणे ते दररोज ३०० नारळ विकतात. मात्र, वाढत्या तापमानामुळे आता दररोज ४०० ते ४५० नारळांची विक्री होत आहे.

दवरली जंक्शनजवळ विक्री करणारे सुरेश नावाचे विक्रेते गेल्या तीन वर्षांपासून आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी नारळ विकतात. उष्णतेबरोबरच लोकांमध्ये हायड्रेशनबाबत जागरूकता वाढली आहे, त्यामुळे मागणी वाढली आहे, असे सुरेश यांनी सांगितले. सुरेश यांनी असेही नमूद केले की, वाढत्या मागणीमुळे नारळांच्या पुरवठ्यात अडथळे येत आहेत. पूर्वी आम्ही प्रत्येक नारळ ४० रुपयांना विकायचो, परंतु आता टंचाईमुळे किंमत ५० रुपयांवर गेली आहे. किंमत वाढली असली तरी ग्राहकांची गर्दी कायम आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. उन्हाळा हा विक्रेत्यांसाठी फायदेशीर हंगाम आहे, पावसाळ्यात व्यवसाय मंदावतो, त्यामुळे उन्हाळ्यातील वाढती विक्री आम्हाला मोठा दिलासा देत आहे. असे सुरेश यांनी सांगितले.

दरम्यान, फातोर्डा येथील ज्येष्ठ नागरिक लक्ष्मण नाईक यांनी सांगितले की ते नेहमी फातोर्डा क्रीडा संकुलाजवळील एका विक्रेत्याकडून नारळ खरेदी करतात. सकाळी ११ वाजेपर्यंतच गर्दी असते आणि दुपारपर्यंत विक्रेत्याकडे नारळ संपतात,असे नाईक यांनी सांगितले. नाईक यांनी असेही नमूद केले की, नारळ हे फळांच्या रसाच्या तुलनेत अधिक सुरक्षित असतात कारण ते नैसर्गिकरित्या पॅक केलेले असल्यामुळे माश्या आणि दूषित पदार्थांपासून मुक्त असतात. वाढत्या मागणीमुळे अनेकदा दिवसाच्या कोणत्याही वेळी नारळ मिळणे कठीण होते, असे नाईक म्हणाले. पूर्वी एक विक्रेता नियमितपणे जॉगिंगसाठी येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना सेवा पुरवत असे. मात्र, सध्याच्या वाढत्या मागणीमुळे पुरवठा करणे अवघड झाले आहे. नारळांप्रमाणेच कलिंगडांच्या मागणीमध्येही लक्षणीय वाढ झाली आहे.

# कूडचडे वाहतूक विभागात अधिकारीच नाहीत

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १४ :** कुडचडे ट्रॅफिक सेल गेल्या दोन महिन्यांहून अधिक काळ पोलिस निरीक्षकाशिवाय कार्यरत असल्याने वाहतूक व्यवस्थापन आणि कायद्यांची अंमलबजावणी यावर परिणाम होत आहे.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अलीकडेच झालेल्या बदल्यांमध्ये कुडचडे ट्रॅफिक सेलचे पोलिस निरीक्षक फोंडा पोलिस स्थानकात बदली झाले आहेत. मात्र, त्यांच्या जागी अद्याप कोणाचीही नियुक्ती न झाल्यामुळे हे पद दोन महिन्यांहून अधिक काळ रिक्त आहे.

केपे ट्रॅफिक सेलचे पोलिस निरीक्षक सध्या कुडचडे ट्रॅफिक सेलचा अतिरिक्त कार्यभार सांभाळत असल्याचे वाहतूक शाखेतील सूत्रांनी सांगितले. कुडचडे मध्ये महानगरपालिका आणि पंचायत क्षेत्रे दोन्ही समाविष्ट असल्याने वाहतूक व्यवस्थापनासाठी समर्पित पोलिस निरीक्षकाची अनुपस्थिती चिंता वाढवणारी आहे.

वाहतूक शाखेत कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याने मोटार वाहन कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात अडचणी येत आहेत. वारंवार होणाऱ्या रस्ते अपघातांमुळे नागरिकांमध्ये असंतोष वाढत असून, वाहतूक नियंत्रणासाठी कडक उपाययोजनांची मागणी केली जात आहे. तथापि, दक्षिण गोव्यातील काही वाहतूक शाखांमध्ये कर्मचाऱ्यांची संख्या लक्षणीयरीत्या कमी झाली आहे.

एका सहाय्यक उपनिरीक्षकाने सांगितले की, या समस्येच्या पार्श्वभूमीवर कोलवा आणि मडगाव येथे दोन सहाय्यक उपनिरीक्षकांसह अतिरिक्त कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. याशिवाय, वाहतूक शाखेतील हेड कॉन्स्टेबलना चालान जारी करण्याचा अधिकार देण्यासाठी हालचाली सुरू आहेत, जेणेकरून अंमलबजावणीची कार्यक्षमता वाढवता येईल. वाहतूक कक्षाची संख्या लवकरच वाढवली जाईल, अशी शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान,कुडचडे वाहतूक कक्षातील एका उपनिरीक्षकासह सहा पोलिस कर्मचारी शेल्डे येथे तैनात आहेत. ते भरलेल्या ट्रक आणि इतर अवजड वाहनांना चालान जारी करत आहेत.

ठेकेदारी बंदीमुळे तपासणीसाठी थांबवलेली जड वाहने रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उभी राहत असल्याने वाहतुकीचा प्रवाह अडथळित होत आहे. त्यामुळे मडगाव–कुडचडे मार्गावरील वाहतूक मंदावली आहे, ज्यामुळे गर्दीच्या भागातून जाणाऱ्या वाहनांना गती कमी करावी लागत आहे.

# मांद्रे जुनसवाड्यातील पदपुलाकडे दुर्लक्ष

### स्टील पदपुलाची दुरावस्था | रेलिंग गायब, धोकादायक स्थितीत : स्थानिकांत नाराजी

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १४ :** मांद्रे जूनसवाडा फॉरेस्ट पार्कनजीक असलेल्या स्टील पदपुलाची दुरवस्था रोखण्याची गरज आहे. चार वर्षे पूर्ण झालेल्या पुलाची रंगरंगोटी व देखभाल करण्याची गरज असून, सरकारी संपतीची जबाबदारी नेमकी कोणत्या खात्याकडे आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया पर्यटकातून होत आहे.



जूनसवाडा : किनाऱ्यावरिल स्टील पदपुल दुरुस्तीच्या प्रतिक्षेत आहे.

साधारण २०२१ मध्ये तत्कालीन आमदार तथा पर्यटन विकास महामंडळाचे चेअरमन दयानंद सोपटे यांच्या कारकिर्दीत पुलाचे उद्‌घाटन झाले होते. त्या पुलाची देखभाल महामंडळ, पंचायत की सरकारचे खाते करतील याबाबत वाच्यता झाली नव्हती. मात्र सद्या त्या पुलाच्या पृष्ठभागावरील पत्र्यांचे सांधे तुटले असून पर्यटक चालताना पत्रे हलतात व वरखाली आदळून, कधीही कोसळून पडण्याची भीती व्यक्त होत आहे. सरकारी प्रकल्पाचे उद्घाटन होते. मात्र त्यानंतर डागडुजी व ताबा कोणाकडे असतो, याबाबत अनेकदा प्रश्नचिन्ह असते. त्यासाठी सरकारने त्यासाठी नियमावली करण्याची गरज आहे.

या स्टील पदपुलामुळे पर्यटक व व्यावसायिकांची किनाऱ्यावर जाण्यासाठी चांगली सोय झाली आहे. प्रतिदिनी शेकडो पर्यटक ये–जा वापर करीत असतात. मात्र सद्या त्या पुलावरून चालत जाणे धोक्याचे बनले आहे. लहान मुलांना दुखापत होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे नागरिक शंकर पेडणेकर यानी सांगितले. या पत्र्याचे जोड वेल्डिंग करून जोडले पाहिजे, अन्यथा, पूर्ण पत्रा तसेच छतावरील लोखंडी खांब सुद्धा नीखळून पडण्याची शक्यता आहे, असे पेडणेकर यानी सांगितले.

या पुलाच्या प्रत्येक स्टील खांबास गंज चढला असून कित्येक खांब निकामी बनल्याचे दिसून येते. त्याची रंगरंगोटी केल्यास त्याची क्षमता आणखीन काही वर्षे टिकून राहील.सरकारच्या दुर्लक्षामुळे या पदपुलाची वाताहात न होवो, अशी मागणी नागरिक सचीत नाईक यांनी केली आहे.

या पुलाकडे जाताना पायऱ्यांचे स्टील रेलिंगसुद्धा तुटलेल्या स्थितीत तर काही भाग चोरट्यांनी लंपास केल्याचे चित्र आहे. त्यामुळे त्याची देखभाल न झाल्यास, शिल्लक रेलिंग चोरट्यांना बोनस ठरेल, असे मत पर्यटक हितेंद्र वालिया, दिल्ली यांनी व्यक्त केले.

दरम्यान, पर्यटन उद्योग वाढीसाठी, मांद्रेचे आमदार जीत आरोलकर यशस्वीपणे प्रयत्न करीत असून, त्यांनी पुढाकार घेऊन सरकारी संपत्तीचा उपयोग पर्यटकांसाठी तसेच पादचारी लोकांना व्हावा, यासाठी पावले उचलावीत, अशी मागणी सर्व थरातून होत आहे.

# कुंडई येथे अपघात; ट्रकची धडक, दुकाने व दुचाकींचे नुकसान

■ टीम दैनिक हेराल्ड




**फोंडा, दि. १४ :** मानसवाडा कुंडई जंक्शनवर गुरुवारी रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास ऑइल पेंट वाहून नेणाऱ्या ट्रकने रस्त्याच्या कडेला असलेल्या दुकानांना धडक दिली. या अपघातात दोन दुचाकी ट्रकच्या चाकाखाली चिरडल्या गेल्या आणि दुकानांचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने, मोठ्या नुकसानीनंतरही कोणतीही जीवितहानी झाली नाही.

प्राप्त माहितीनुसार, हा ट्रक कुंडईमधून पुण्याच्या दिशेने ऑईल पेंट घेऊन निघाला होता. मानसवाडा कुंडई येथे पोहोचताच मागून आलेल्या दुसऱ्या ट्रकने या ट्रकला धडक दिली. या धडकेमुळे ट्रकवरील नियंत्रण सुटले आणि तो रस्त्याच्या कडेला असलेल्या दुकानांवर जाऊन आदळला. ट्रकच्या चाकाखाली दोन दुचाकींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अपघातावेळी रात्रीचे ९.३० वाजले असल्याने परिसरात फारशी वर्दळ नव्हती, त्यामुळे संभाव्य जीवितहानी टळली.

अपघातानंतर ट्रकमधील ऑइल पेंट रस्त्यावर आणि गटारात वाहू लागल्याने परिसर पांढऱ्या रंगाने माखला. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण झाला आणि स्थानिकांमध्ये संतापाची लाट उसळली.

घटनास्थळी उपस्थित असलेल्या स्थानिक नागरिकांनी वाहतुकीसाठी बायपास रस्त्याचे रुंदीकरण त्वरित पूर्ण करण्याची मागणी केली आहे. सरपंच सुर्वेश गावडे यांनी सांगितले की, दोन वर्षांपूर्वी या जंक्शनवर झालेल्या अपघातांमुळे स्थानिकांनी आंदोलन केले होते. त्यानंतर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने बायपास रस्त्याचे रुंदीकरण करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, काम संथ गतीने सुरू असल्याने समस्या कायम आहे.

आमच्या मागण्या दीर्घकाळ प्रलंबित आहेत. महामार्गावरील वाहतूक गावातील रस्त्यावरून वळवली जात असल्याने नागरिकांच्या जीवितासह मालमत्तेलाही धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे बायपासचे रुंदीकरण त्वरित पूर्ण करावे, अशी मागणी गावडे यांनी केली.

सध्या पणजीहून फोंडा येथे जाणारी वाहतूक अरुंद बायपास मार्गावरून होते, तर फोंडाहून पणजीकडे जाणारी वाहतूक विद्यमान राष्ट्रीय महामार्गावरून होते. गेल्या काही वर्षांपासून मानसवाडा कुंडई येथे घडत असलेल्या जीवघेण्या अपघातांमुळे स्थानिकांनी वाहतूक व्यवस्था सुधारण्याची मागणी केली आहे. मुख्यमंत्र्यांनी या प्रश्नाकडे लक्ष द्यावे आणि बायपासचे रुंदीकरण चार पदरी करण्याचे काम वेगाने पूर्ण करावे, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.

# होळीचा आनंद घेताना दोन तरुणांचा मृत्यू

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. १४ :** होळीचा आनंद साजरा करताना उसगाव गांजे नदीत बुडून दोन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. शुक्रवारी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास ही दुर्दैवी घटना घडली. मृतांमधले दोघेही खाडपाबांध (फोंडा)चे रहिवासी असून दोघेही मूळचे कर्नाटकचे आहेत.

याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार होळी सणानिमित्त आणि कडक उन्हामुळे सुमारे ४० जणांचा गट गांजे धरणावर पिकनिकसाठी गेला होता. काही जण नदीत आंघोळ करत असताना अचानक प्रकाश शंकरप्पा हडपड (२०) आणि शरणप्पा संगप्पा हडपड (२०) हे दोघेही बुडू लागले. त्यावेळी उपस्थित स्थानिकांनी मदतीसाठी धाव घेतली. स्थानिकांनी तातडीने बचावकार्य राबवले. फोंडा अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचण्यापूर्वीच दोघांना पाण्यातून बाहेर काढण्यात आले. मात्र, त्यांचे प्राण वाचवण्यात अपयश आले. स्थानिकांनी अजून एका तरुणाला बुडण्यापासून वाचवण्यात यश मिळवले. घटनेनंतर गावात शोककळा पसरली असून मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. पुढील तपास पोलिस करत आहेत.

**ST. JOSEPH VAZ EDUCATIONAL SOCIETY**
**Instituto Nossa Senhora de Piedade, D.B.Marg, Panjim Goa. 403001. INDIA**
Applications with full Biodata are invited from Indian citizens
**FOR THE POST OF PRINCIPAL**
(Full time Regular basis-Grant-in-Aid)
**FOR ST. JOSEPH VAZ COLLEGE, CORTALIM, MORMUGAO– GOA**
[Affiliated to Goa University & Recognized by the UGC]

**A) Eligibility:**
I) Ph.D. degree
ii) Professor/Associate Professor with a total service/experience of at least 15 years of teaching/research in universities, colleges and other institutions of higher education.
iii) A minimum of 10 research publications in peer reviewed journals as approved by Goa University from time to time or UGC-listed journals out of which at least two should be in scopus/web of science journals.
iv) A minimum of 110 Research Score as per Appendix II, Table 2 of Goa University Statute SC-16
v) Minimum qualifications and other requirements as prescribed by Goa University Statutes SC-16.4

**B) Tenure:**
A College Principal shall be appointed for a period of five years, extendable for another term of five years on the basis of performance assessment by a Committee appointed by the University, constituted as per the Statutes of Goa University.

**C) Essential Requirements:**
a) Knowledge of Konkani language. Additionally, knowledge of Marathi shall be desirable.
b) 15 years of residence certificate in Goa issued by competent authority

**Scale of pay:** As prescribed by UGC, Goa University and Directorate of Higher Education, Government of Goa from time to time.
Service Conditions: As prescribed by the UGC, Goa University, Directorate of Higher Education, Government of Goa, St. Joseph Vaz Educational Society and other competent authorities from time to time.
Applicants who are already employed shall send in their applications through proper channel.
Application completed in all respects alongwith self-certified photocopies of statements.
of marks of all public examinations from S.S.C. onwards, API scoresheet and other certificates should reach **the Secretary, St. Joseph Vaz Educational Society, Institutode Nossa Senhora de Piedade, D.B. Marg, opp. to Virani, Panjim, Goa, 403001,** within 20 days from the date of publication of advertisement by super scribing on the envelope "Application for the post of Principal". Late submission or incomplete applications in any manner will not be accepted.

**Secretary**
**St. Joseph Vaz Educational Society,**
Panjim,Goa.
Date:15/3/2025